सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग,निर्णय क्रमांक.सीटीई -२६१८/प्र.क्र ८५ / पोल-३, दि.१७/०९/२०२५

**विषय :-** पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील पोलीस स्टेशन पारडी, वाठोडा व कपिलनगर करिता नव्याने निर्माण केलेल्या ३३५ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक. सीटीई -२६१८/प्र.क्र ८५ / पोल-३,,दि.१७/०९/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०९१७१६०३३११३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 23-09-2025 10:36:59

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, का.क्र. २६-ब

प्रत,
अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (पुर्नरचना)
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील पोलीस स्टेशन पारडी, वाठोडा व कपिलनगर करिता नव्याने निर्माण केलेल्या ३३५ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीटीई-२६१८/प्र.क्र.८५ /पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ सप्टेंबर, २०२५.

**वाचा:-**

१) शासन निर्णय,गृह विभाग क्र.पीओएस-२६१६/प्र.क्र.१३८/पोल-३, दि.२१.०४.२०१८.
२) शासन निर्णय,गृह विभाग क्र.पीओएस-२६१६/प्र.क्र.१३९/पोल-३, दि.२१.०४.२०१८.
३) शासन निर्णय,गृह विभाग क्र.पीओएस-२६१७/प्र.क्र.११९/पोल-३, दि.२१.०४.२०१८.
४) शासन निर्णय,गृह विभाग क्र.सीटीई-२६१८/प्र.क्र.८५/पोल-३, दि.२१.०३.२०२५
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/ मुदतवाढ/ पारडी,वाठोडा,कपिलनगर/३६/२०१८, दि.१३.०८.२०२५.
६) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.२६.०८.२०२५.

**शासन निर्णय:-**

उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय, दि.२१.०४.२०१८ व्दारे पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील कळमना पोलीस ठाण्याचे विभाजन करून पारडी पोलीस ठाणे निर्माण करण्यात आले असून, संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णय दि.२१.०४.२०१८ व्दारे नंदनवन पोलीस ठाण्याचे विभाजन करून वाठोडा पोलीस ठाणे व उपरोक्त संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णय दि.२१.०४.२०१८ व्दारे जरीपटका पोलीस ठाण्याचे विभाजन करून कपीलनगर पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पोलीस आयुक्त,नागपूर शहर यांच्या आस्थापनेवर नवनिर्मित पोलीस ठाणे,वाठोडा,कपीलनगर व पारडी करिता अनुक्रमे ६०,११७ व १५८ पदे अशी विविध संवर्गातील एकूण ३३५ पदे निर्माण करण्यात आली आहेत.

२. उपरोक्त संदर्भ क्र.४ येथील दि.२१.०३.२०२५ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे उक्त ३३५ पदांना यापूर्वी दि.०१.०३.२०२५ ते दि.३१.०८.२०२५ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आली होती. आता उपरोक्त संदर्भ क्र.५ येथील दि.१३.०८.२०२५ रोजीच्या पत्राव्दारे पोलीस महासंचालक कार्यालयाने उक्त पदांना दि.०१.०९.२०२५ पासून पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

३. उपरोक्त ३ पोलीस स्टेशनचा पदनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

**१) पोलीस आयुक्त,नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील पारडी पोलीस ठाणे करिता नवनिर्मित पदे**

| अ. | पदनाम | पद संख्या | पदे निर्माण केल्याचा शासन निर्णय व दिनांक | यापूर्वी मुदतवाढ दिलेला शासन निर्णय व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | ०२ | शासन निर्णय क्र.पीओएस-२६१६/प्र.क्र.१३८/पोल-३, दि.२१.०४.२०१८ | शासन निर्णय क्र.सीटीई-२६१८/प्र.क्र.८५/पोल-३, दि.२१.०३.२०२५ |
| २ | पोलीस उप निरीक्षक | १० | | |
| ३ | सहायक पोलीस उप निरीक्षक | १० | | |
| ४ | पोलीस हवालदार | ४५ | | |
| ५ | पोलीस शिपाई | ८५ | | |
| ६ | चालक पोलीस शिपाई | ०६ | | |
| | **एकूण** | **१५८** | | |

**२) पोलीस आयुक्त,नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील वाठोडा पोलीस ठाणे करिता नवनिर्मित पदे**

| अ. | पदनाम | पद संख्या | पदे निर्माण केल्याचा शासन निर्णय व दिनांक | यापूर्वी मुदतवाढ दिलेला शासन निर्णय व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | ०२ | शासन निर्णय क्र.पीओएस-२६१६/प्र.क्र.१३९/पोल-३, दि.२१.०४.२०१८ | शासन निर्णय क्र.सीटीई-२६१८/प्र.क्र.८५/पोल-३, दि.२१.०३.२०२५ |
| २ | पोलीस उप निरीक्षक | १२ | | |
| ३ | सहायक पोलीस उप निरीक्षक | ०५ | | |
| ४ | पोलीस हवालदार | १५ | | |
| ५ | पोलीस शिपाई | २० | | |
| ६ | चालक पोलीस शिपाई | ०६ | | |
| | **एकूण** | **६०** | | |

**३) पोलीस आयुक्त,नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील कपिलनगर पोलीस ठाणे करिता नवनिर्मित पदे**

| अ. | पदनाम | पद संख्या | पदे निर्माण केल्याचा शासन निर्णय व दिनांक | यापुर्वी मुदतवाढ दिलेला शासन निर्णय व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | ०२ | शासन निर्णय क्र.पीओएस-२६१६/प्र.क्र.११९/पोल-३,दि.२१.०४.२०१८ | शासन निर्णय क्र.सीटीई-२६१८/प्र.क्र.८५/पोल-३, दि.२१.०३.२०२५ |
| २ | पोलीस उप निरीक्षक | १५ | | |
| ३ | सहायक पोलीस उप निरीक्षक | ०५ | | |
| ४ | पोलीस हवालदार | २० | | |
| ५ | पोलीस शिपाई | ६५ | | |
| ६ | चालक पोलीस शिपाई | ०८ | | |
| ७ | सफाईगार | ०२ | | |
| | **एकूण** | **११७** | | |

४. आता पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या पोलीस स्टेशन पारडी, वाठोडा व कपिलनगर करिता नव्याने निर्माण केलेल्या ३३५ अस्थायी पदांना **दिनांक ०१ सप्टेंबर, २०२५ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत** खालील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) सहा महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त पदे वगळून उर्वरित पदांना मुदतवाढ देण्यात यावी. तसेच पदे ज्या कारणास्तव ज्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर केली आहेत, त्याचे पालन करण्यात यावे.

५. उक्त खर्च गृह विभाग मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस-१०९,जिल्हा पोलीस-१०९ (००) (०१) जिल्हा पोलीस बल या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो **सन २०२५-२६** या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक - पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक २६.०८.२०२५ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९१७१६०३३११३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.09.17 16:04:27 +05'30'

**(रा. ता. भालवणे)**
**उपसचिव, गृह विभाग**

प्रत,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त,नागपूर.
३) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई .
४) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
७) वित्त विभाग (व्यय-७) / वित्तिय सुधारणा-१.
८) निवड नस्ती.